पिंपरी चिंचवड महानगरपालिका
औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी
पिंपरी – ४११ ०१८

# जाहिर प्रकटन

**विषय – शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करणेकामी आवेदन पत्र (अर्ज) भरण्यास मुदतवाढ देणेबाबत…**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी अस्थापनेवर शिकाऊ उमेदवार (Apprenticeship) म्हणून १ वर्ष कालावधी करीता सन २०२३-२०२४ साठी मनपाचे अधिकृत वेबपोर्टल www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर (मुख्य पृष्ठ – आमच्याबद्दल – नोकरीविषयक - शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२३-२४) पिंपरी चिंचवड मनपाच्या औद्योगिक प्रशिक्षण विभागामार्फत दिनांक ३०/१०/२०२३ रोजी क्रमांक - औप्रसं/०५/कावि/३८६ /२०२३ दिनांक २७/१०/२०२३ अन्वये सविस्तर जाहिरात प्रसिध्द करणेत आली आहे. सदर जाहिरात प्रकटनाच्या अनुषंगाने Online अर्ज स्विकारण्याच्या कालावधीला दिनांक २२/११/२०२३ पर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे. तरी असून इच्छुक उमेदवारांनी मनपा पोर्टलवरील जाहिरात प्रकटनाच्या अनुषंगाने दिनांक २२/११/२०२३ पर्यंत apprenticeshipindia.gov.in (NAPS PORTAL) या संकेतस्थळावर ऑनलाईन apply करुन दिनांक २४/११/२०२३ पर्यंत सदर अर्ज व कागदपत्राची हार्ड कॉपी आय.टी.आय मोरवाडी येथे जमा करावी.

सही/-
(शशिकांत पाटील)
**प्राचार्य**
औद्योगिक प्रशिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

क्र. औप्रसं/०५/कावि/ ३९९ /२०२३
दि. ७ /११/२०२३

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.**
**शिकाऊ उमेदवार नेमणूक**
**जाहिरात प्रकटन सन २०२३-२४**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये एक वर्ष प्रशिक्षण (Apprentice) कालावधीकरीता खालील व्यवसाय आरक्षणनिहाय आय.टी.आय.शैक्षणिक अर्हतेनुसार व पदांचे संख्येनुसार अर्हताधारक शिकाऊ उमेदवारांकडून अर्ज मागविणेकामी मनपाचे अधिकृत वेबपोर्टल **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | पदांची संख्या | अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | वि. मा. प्र. | इ. मा. व. | आ. दु. घ. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोपा (PASSA) | १०० | १३ | ०७ | ३ | ३ | ३ | २ | २ | १९ | १० | ३८ |
| २ | वीजतंत्री (Electrician) | ५९ | ०८ | ०४ | २ | २ | २ | १ | १ | ११ | ०६ | २२ |
| ३ | तारतंत्री (Wireman) | ४६ | ०६ | ०३ | १ | १ | २ | १ | १ | ०९ | ०५ | १७ |
| ४ | रेफ्रिजेरेशन अँड वातानुकुलन मेकॅनिक (RACT) | २६ | ०३ | ०२ | १ | १ | १ | १ | ० | ०५ | ०२ | १० |
| ५ | नळ कारागीर (Plumber) | २४ | ०३ | ०२ | १ | १ | १ | १ | ० | ०४ | ०२ | ०९ |
| ६ | डेस्कटॉप ऑपरेटींग (DTP) | १६ | ०२ | ०१ | १ | ० | १ | ० | ० | ०३ | ०२ | ०६ |
| ७ | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १२ | ०२ | ०१ | १ | ० | ० | ० | ० | ०२ | ०१ | ०५ |
| ८ | इंस्ट्रुमेंट मेकॅनिक (IM) | १० | ०१ | ०१ | १ | ० | ० | ० | ० | ०२ | ०१ | ०४ |
| ९ | आरेखक स्थापत्य (Draughtsman Civil) | ०४ | ०१ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| १० | भूमापक (Surveyor) | ०४ | ०१ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| ११ | मेकॅनिक मोटर व्हेईकल (MMV) | ०२ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ |
| | एकूण | ३०३ | | | | | | | | | | |

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | प्रशिक्षण कालावधी | गुणानुक्रम वर्गवारी (Eligibility Criteria) | विद्यावेतन र.रू. (प्रति माह) |
|---|---|---|---|---|
| १ | कोपा (PASSA) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील कोपा-पासा कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |
| २ | वीजतंत्री (Electrician) | २ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील इलेक्ट्रिशियन कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ३ | तारतंत्री (Wireman) | २ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील वायरमन कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ४ | रेफ्रिजेरेशन अँड वातानुकुलन मेकॅनिक (RACT) | २ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील रेफ्रिजेरेशन अँड वातानुकुलन मेकॅनिक कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ५ | नळ कारागीर (Plumber) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील प्लंबर कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |
| ६ | डेस्कटॉप ऑपरेटींग (DTP) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील डेस्कटॉप ऑपरेटींग कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |
| ७ | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील पंप ऑपरेटर कम मेकॅनिक कोर्स उत्तीर्ण उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | इंस्ट्रुमेंट मेकॅनिक (IM) | २ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील इंस्ट्रुमेंट मेकॅनिक कोर्स उत्तीर्ण उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ९ | आरेखक स्थापत्य (Draughtsman Civil) | २ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील आरेखक स्थापत्य कोर्स उत्तीर्ण उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| १० | भूमापक (Surveyor) | २ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ११ | मेकॅनिक मोटर व्हेईकल (MMV) | २ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील मेकॅनिक मोटर व्हेईकल कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |

<u>अटी व शर्ती-</u>

१) उमेदवाराने apprenticeshipindia.gov.in (NAPS PORTAL) संकेतस्थळावर १००% प्रोफाईल आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करुन नोंदणी करणे आवश्यक आहे.

२) सदरच्या नेमणूका ह्या फक्त शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार विहित केलेल्या प्रशिक्षण कालावधीसाठी रिक्त होणा-या जागेवर केल्या जाणार आहेत. शिकाऊ उमदेवार अधिनियमानुसार प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर नेमणूक संपुष्टात येईल. अशा उमेदवारांचा महापालिकेतील कोणत्याही पदांवर हक्क राहणार नाही.

३) सदर जाहीरातीच्या अनुषंगाने उमेदवाराने NAPS PORTAL वर दिनांक ०७/११/२०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

४) NAPS PORTALवर Apprenticeship opportunities मधून ऑनलाईन apply केलेनंतर उमेदवाराने संपूर्ण भरलेला प्रोफाईल अर्ज, जातीचा दाखला / प्रमाणपत्र, आधारकार्ड, आय.टी.आय उत्तीर्ण प्रमाणपत्र व बँक पासबुकची फोटो कॉपी इ. कागदपत्रे हार्ड कॉपी स्वरुपात औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी , पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे दिनांक ०९/११/२०२३ पर्यंत सायं ६.०० वाजेपर्यंत जमा करावीत.

५) शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग, अंतिम परिक्षा वर्षातील गुण इ. संदर्भात अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जातील संबंधित रकान्यात माहिती स्पष्टपणे नमूद केले नसल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्जाची हार्ड कॉपी कार्यालयात जमा केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

६) ज्या उमेदवाराने यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अथवा इतर कोणत्याही आस्थापना / संस्थेत apprenticeship (शिकाऊ / शिक्षू प्रशिक्षणार्थी ) केली आहे. अशा उमेदवारांची दुबार नेमणूक करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

७) apprenticeshipindia.gov.in (NAPS PORTAL) संकेतस्थळावर करार नोंदणी केलेनंतर करार कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात आणता येणार नाही.

८) अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर सर्व उमेदवारांची सर्वसाधारण निवड / प्रतिक्षा यादी आरक्षणानुसार मनपाचे अधिकृत वेब पोर्टलवर प्रसिध्द करणेत येईल.

९) apprenticeshipindia.gov.in वर Online अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक ३०/१०/२०२३ रोजी सकाळी ९.४५ वा. पासून ते ०७/११/२०२३ रोजी सायंकाळी ६.१५ वा. पर्यंत राहील. शिकाऊ उमेदवार नेमणूकीची जाहीरात फक्त www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळावर (मुख्य पृष्ठ – भरती – शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२३-२४) किंवा (मुख्य पृष्ठ – आमच्याबद्दल – नोकरीविषयक - शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२३-२४) किंवा (HOME - ABOUT – Recruitment - Apprenticeship २०२३-२४) उपलब्ध आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवारांकरीता NAPS PORTAL वर Opportunity create करण्यात आली असल्याने उमेदवारांनी सदर Portal वर विहित मुदतीत ऑनलाईन apply करणे आवश्यक राहील. पोस्टाने कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१०) ITI प्रशिक्षण उत्तीर्ण वर्ष मागील तीन (ऑगस्ट २०२१ , ऑगस्ट २०२२ व ऑगस्ट २०२३) वर्षा मधील असणे आवश्यक आहे. तसेच पासा या व्यवसायाकरिता मराठी / इंग्रजी टंकलेखन उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य राहील.

११) नियुक्त झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून ०८ दिवसांचे आत रूजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१२) ऑनलाईन कागदपत्रे तपासणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची निकषाप्रमाणे निवडीसाठी कार्यवाही करण्यात येईल. यामधून जाहिरातीमध्ये नमूद केलेली व्यवसाय पदे आरक्षणानुसार भरण्यात येईल.

१३) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी/शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच वरिष्ठांनी नेमून दिलेले कामकाज करण्यास नकार दिल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नेमणूक रद्द करणेत येईल.

१४) उमेदवारांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१५) उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यावेतन अदा केले जाणार नाही.

१६) नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा.प्राचार्य , औद्योगिक प्रशिक्षण विभाग यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी शिकाऊ उमेदवार नेमणूक प्रशिक्षणार्थी कालावधी समाप्त करण्याचा अधिकार राहील.

१७) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांचा प्रशिक्षणार्थी कालावधी समाप्त करण्यात येईल.

१८) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस प्रशिक्षण कालावधीमध्ये काही आजार उद्भवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१९) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस प्रशिक्षण पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा प्रकारचा इतर कोणताही व्यवसाय करण्यास प्रतिबंध राहील. तसेच त्यांना कामकाजासंबंधीची कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

२०) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस विद्यावेतनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

२१) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना / दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी / निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यानंतरही कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

२२) अपात्र/निवड न झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२३) शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करून घेणेत येईल.

२४) ऑनलाईन जोडण्यात आलेल्या कागदपत्रांचे तपासणीचे वेळी शैक्षणिक अर्हता धारण न करणे / अपुर्ण कागदपत्रे सादर करणारे / अर्जात चुकीची माहिती भरणे अशा उमेदवारांस निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

२५) अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा अचूक ई-मेल पत्ता व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

२६) उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी व इतर सूचना ह्या वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी शिकाऊ प्रशिक्षण नेमणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच याबाबत **उमेदवारांने समक्ष आय.टी.आय मोरवाडी येथे येवून विचारणा करू नये.**

२७) अर्ज करणा-या उमेदवारांनी दि. ३०/१०/२०२३ पर्यंत ज्या व्यवसायाचे प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज केला आहे. त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हता धारण करणे / अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२८) नेमणूकीसाठी आवश्यकतेनुसार बोलविल्यास उपस्थित उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास व इतर खर्च दिला जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

२९) केंद्रशासनाने निश्चित केलेल्या दरानुसार शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना व सविस्तर जाहिरात महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करून apprenticeshipindia.gov.in वर ऑनलाईन अर्ज करावेत.

सही/-

(शशिकांत पाटील)

**प्राचार्य**

औद्योगिक प्रशिक्षण विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८

क्रमांक : औप्रसं/ ०५ /कावि/३८६/२०२३

दिनांक :२७/१०/२०२३